# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**प्रेस नोट**

**दिनांक ३०/०६/२०२२ (शुक्रवार)**

**(सायंकाळ)**

---

### पोलीस अधीक्षक यांच्याकडुन सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना भावपुर्ण निरोप

दिनांक ३०/०६/२०२२ रोजी नागपूर (ग्रामीण), पोलीस दलातुन सेवानिवृत्त होणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना पोलीस अधीक्षक कार्यालय, नागपूर (ग्रामीण), येथे निरोप देण्याकरीता आमंत्रित करण्यात आले. यावेळी एका **"निरोप समारंभाच्या"** कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सेवानिवृत्त होणाऱ्या १) उपविभागीय पोलिस अधिकारी श्री. राजेन्द्र शंकरराव चव्हाण, उपविभागीय कार्यालय रामटेक विभाग २) पोलिस उमनिरीक्षक श्री राजललन ठाकुरप्रसाद त्रिपाठी, नियंत्रण कक्ष, ना.ग्रा., ३) सहायक फौजदार श्री. शंकरराव रामचंद्र तराळे, पोलिस मुख्यालय, ना. ग्रा, ४) श्रेणी पोलिस उपनिरीक्षक श्री. देवीदास पैकुजी सातंगे, पो.स्टे. जलालखेडा, ५) पोलिस उपनिरीक्षक श्री बाबुराव दिनानाथ पराते, पोलिस अधिक्षक कार्यालय ना.ग्रा., ६) श्रेणी पोलिस उपनिरीक्षक श्री श्रीकृष्णा नामदेवराव श्रावणकर, पो.स्टे. अरोली, ७) पोलिस हवालदार श्री प्रल्हाद लक्ष्मणराव चौधरी, पो.स्टे. केळवद, ८) पोलिस हवालदार विनोद कृष्णराव झाडे, पो.स्टे. भिवापुर, ९) पोलिस नाईक श्री बाबापोषाक भाकरूजी मेश्राम पो.स्टे. पारशिवनी व १०) प्रमुख लिपीक श्रीमती रेखा भगवान झोडे, पोलिस अधीक्षक कार्यालय, ना. ग्रा यांना पोलीस अधिक्षक श्री. विजयकुमार मगर, नागपूर विभाग नागपूर यांच्या शुभहस्ते पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व भेटवस्तु देवून निरोप देण्यात आला आहे. तसेच सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांना पोलीस अधीक्षक यांनी त्यांना पुढील आयुष्य सुख समृध्दीचे व आरोग्य संपन्न राहावे अश्या शुभेच्छा दिल्या. सेवानिवृत्ती नंतर त्यांचा कोणत्याही प्रलंबित कार्यालयीन कामकाजात अडथळा होणार नाही अशी ग्वाही पोलीस अधीक्षक यांनी यावेळी दिली. तसेच पोलीस दलातील सेवानिवृत्त पर्यंतचा कालावधी हा यशस्वीरीत्या पार पाडला याबद्दल पोलीस अधीक्षक यांनी सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची प्रशंसा केली.

या कार्यक्रमाला अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर, उप पोलीस अधीक्षक (गृह) श्री. संजय पुरंदरे व कार्यालयातील इतर अधिकारी व कर्मचारी (स्टाफ) उपस्थित होते.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर